**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या कार्यालयातील अस्थायी पदांना दि.१.१.२०१८ ते दि.२८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

मराठी भाषा विभाग

शासन निर्णय क्रमांकः अस्थाप-२०१७/प्र.क्र.१०९/आस्था-२,

नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: १६ जानेवारी,२०१८.

वाचा-

१) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण- २००१/प्र.क्र.२९८/सां.का.१, दिनांक २३ मार्च २००६ व शुद्धीपत्रक दिनांक ५.५.२००६.

२) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदसु-२०१४/प्र.क्र.१४०/आस्था-२, दिनांक २.०१.२०१६.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दिनांक ११.०२.२०१६.

४)मराठी भाषा विभाग,आदेश क्र.विश्वप-२०१६/प्र.क्र.९६/आस्था-२ दि.२०.०६.२०१६.

५) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : अस्थाप-२०१६/प्र.क्र.३७/आस्था-२, दिनांक ०६.१०.२०१६.

६) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक १०.०२.२०१७.

७) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : अस्थाप-२०१७/प्र.क्र.३०/आस्था-२, दिनांक २८.०२.२०१७.

८) मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्रमांक : अस्थाप-२०१७/प्र.क्र.३०/आस्था-२, दिनांक ११.१०.२०१७.

९) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे पत्र क्र.विनिमं-२०१७/ प्रशासन/अस्थायी पदे/२२६५, दिनांक १९.१२.२०१७.

१०) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क.,दिनांक ०८.१.२०१८.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या मुंबई येथील ६ व वाई येथील २८ अशा एकूण ३४ अस्थायी पदांना संदर्भाधिन क्र.८ येथील दि.११.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. संदर्भ क्र.४ येथील आदेशान्वये वाई कार्यालयातील २ पदे मुंबई कार्यालयात वर्ग करण्यात आली आहेत.

२. आता संदर्भाधीन क्र.१० येथील दि.०८.१.२०१८ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय विभागांना दिलेल्या प्राधिकारास अनुसरुन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वरील संदर्भ क्र.९ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रशासकीय कार्यालय, मुंबई येथील ६ पदे व मराठी विश्वकोश कार्यालय, वाई येथील २८ पदे (मराठी विश्वकोश नकाशा (मानचित्रसंग्रह खंड २२) साठी ३ पदांसह) अशा एकूण ३४ अस्थायी पदांना **दिनांक १ जानेवारी, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी,२०१८** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**प्रशासकीय कार्यालय, मुंबई**

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | पदनाम | अस्थायी पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, प्रशासकीय कार्यालय, मुंबई. | सचिव | १ | १५६००-३९१०० (ग्रेड वेतन रु.६६००) |
| | | कनिष्ठ लघुलेखक | १ | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४३००) |
| | | अध्यक्षांचे स्वीय सहायक | १ | ९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४३००) |
| | | वरिष्ठ लिपिक | १ | ५२००- २०२०० (ग्रेड वेतन रु.२४००) |
| | | वाहनचालक | १ | ५२००- २०२०० (ग्रेड वेतन रु.१९००) |
| | | शिपाई | १ | ४४४०-७४४० (ग्रेड वेतन रु.१३००) |
| | **एकूण पदे** | | ६ | |

**मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, जि.सातारा.**

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | पदनाम | अस्थायी पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| २. | **विभागीय कार्यालय** | | | |
| | मराठी विश्वकोश कार्यालय,वाई जि.सातारा | विभाग संपादक | २ | मासिक ठोक मानधन रू.२१०००/- |
| | | सह संपादक | ३ | मासिक ठोक मानधन रू.१४०००/- |
| | | कला संपादक | १ | मासिक ठोक मानधन रू.११०००/- |
| | | प्रमुख चित्रकार | १ | मासिक ठोक मानधन रू.१००००/- |
| | | विद्याव्यासंगी सहायक | ४ | ९३००-३४८००(ग्रेड वेतन रु.४४००) |
| | | संपादकीय सहायक | ५ | ५२००-२०२००(ग्रेड वेतन रु.२८००) |
| | | ग्रंथालयीन सहायक | ३ | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रू.२०००) |
| | | लिपिक-टंकलेखक (मराठी) | २ | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रू.१९००) |
| | | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | १ | ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रू.१९००) |

| अ.क्र | कार्यालयाचे नाव | पदनाम | अस्थायी पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | शिपाई | २ | ४४४०-७४४० (ग्रेड वेतन रू.१३००) |
| | | झाडूवाला-हमाल | १ | ४४४०-७४४० (ग्रेड वेतन रू.१३००) |
| | **एकूण पदे** | | २५ | |
| | **मराठी विश्वकोश नकाशा (मानचित्रसंग्रह ) खंडासाठी (खंड २२)** | | | |
| ३. | | प्रमुख मानचित्रकार | १ | मासिक ठोक मानधन रू.११००० |
| | | सहायक मानचित्रकार | १ | मासिक ठोक मानधन रू.८५०० |
| | | संदर्भ सहायक | १ | मासिक ठोक मानधन रू.८००० |
| | **एकूण पदे** | | ३ | |
| **(१+२+३) एकूण अस्थायी पदे (६+२५+३)** | | | ३४ | |

३. सदर बाबीवर होणारा खर्च “मागणी क्रमांक झेडएफ-०२, २२०५, कला व संस्कृती, ००, १०२, कला व संस्कृती प्रचालन (०१) योजनेतर योजना (०१) (०२) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ (२२०५३१८१) ०१ वेतन” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : पदनि २०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि.०८ जानेवारी २०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक **२०१८०११५१५५४३७७४३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nanda Maruti Raut
Digitally signed by Nanda Maruti Raut
Date: 2018.01.17 11:56:10 +05'30'

**( नंदा मा.राऊत)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा व परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
५. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
६. उप जिल्हा कोषाधिकारी, वाई, जि.सातारा.
७. सहायक सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई, जि.सातारा.
८. वित्त विभाग (व्यय-४) व आकृतीबंध पुनर्रचना कक्ष, मंत्रालय, मुंबई.
९. मराठी भाषा विभागाची सर्व कार्यासने.
१०. निवडनस्ती.